महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001
e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्र. नाविमं/उमागो/प्रात्यक्षिक/१६२
नागपूर, दि. १३/०१/२०२५

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
भंडारा/चंद्रपूर/नागपूर/वर्धा/गडचिरोली/गोंदिया.

विषय :— माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२वी) परीक्षा फेब्रु/मार्च २०२५ चे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत ( Practical & Internal ) मुल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत.

संदर्भ :— राज्य मंडळाचे पत्र क. रा. मं./ परीक्षा—२ /१२० पुणे—४११००४ दिनांक ०९/०१/२०२५

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२वी) परीक्षा फेब्रु/मार्च २०२५ साठी गणकयंत्र विभागामार्फत सर्व शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना Online पध्दतीने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाचे गुण व श्रेणी मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर Login मधून भरण्याची सुविधा देण्यात येणार आहे.

गतवर्षीप्रमाणेच फेब्रु/मार्च २०२५ च्या परीक्षेसाठी 'आऊट ऑफ टर्न' ने आयोजित करावयाच्या प्रात्यक्षिक, तोंडी व तत्सम परीक्षा संबंधित शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत आयोजित करण्यात याव्यात. सदर 'आऊट ऑफ टर्न' परीक्षांचे गुण व श्रेणी ही उपरोक्त प्रमाणे Online पध्दतीने मंडळाकडे पाठवावयाचे आहे.

त्याअनुषंगाने सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना Online पध्दतीने गुण भरुन मंडळाकडे कशाप्रकारे पाठवावयाचेत याबाबत सर्वसाधारण सूचना या पत्रासोबत देण्यात येत आहे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपी,
१) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे—४ यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित
२) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित
३) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) जि. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून देणे.

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रु/मार्च २०२५

## प्रात्याक्षिक, तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, श्रेणी इत्यादी परीक्षांचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबतची कार्यपद्धती.

१. फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेपासून इ. १२ वी व इ. १० वी च्या प्रात्याक्षिक, तोंडी, अंतर्गत मुल्यमापन,श्रेणी इत्यादी परीक्षेचे गुण व श्रेणी प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालय/शाळा यांनी मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Internal / Practical Mark & Grade या Link मधून मंडळाकडे पाठवावयाचे आहेत.

२. गुण नोंदविण्याकरीता Maker-Checker कार्यपद्धती वापरावयाची असुन,त्याकरीता सध्याच्या Login Id जसे इ.१२ वी (Jxxxxxx_1) तसेच इ.१० वी (Sxxxxxx_1) हा अनुक्रमे प्राचार्य/मुख्याध्यापक यांचेसाठी असुन, त्यांनी Checker म्हणुन काम करावयाचे आहे. तर इतर शिक्षक / लिपिक यांनी Maker मधून गुण नोंदविण्याचे काम करावयाचे आहे.

३. Maker Login मध्ये विषय निहाय/माध्यम निहाय त्या त्या विषयाच्या विद्यार्थ्यांची कोरी पृष्ठे (Blank Marksheet) प्रात्याक्षिक परीक्षेदरम्यान गुणांकन करण्यासाठी उपलब्ध होतील. तसेच त्यासंदर्भातील तारखा स्वतंत्ररित्या कळविण्यात येतील

४. विषयनिहाय प्रात्याक्षिक/अंतर्गत मूल्यमापन झाल्यानंतर संबंधित विषयाच्या कोऱ्या गुणपत्रकावर (Blank Marksheet) बैठक क्रमांकानुसार (Seat no. wise) गुणांच्या/श्रेणीच्या नोंदी घेऊन. Maker Login मधुन त्याची HSC Marks/Grade या Option मध्ये Online Entry करायाची आहे सदर गुणांची नोंद योग्य झाली आहे का याबाबत Printout काढुन खात्री करता येईल. एका विषयाच्या सर्व गुणांची/श्रेणीची Online नोंद झाल्यानंतर त्या विषयाकरीता "Send for Approval to Checker" हा Option Enable होईल.त्याद्वारे सर्व पृष्ठ ही Checker कडे तपासणीसाठी पाठविता येतील,अशाप्रकारे सर्व विषयांची पृष्ठे Entry पुर्ण करून Checker कडे तपासणीसाठी पाठवावयाची आहेत.

५. Checker User ला इ.१२ वी (Jxxxxxx_1) तसेच इ.१० वी (Sxxxxxx_1) त्याचे Login मध्ये Maker User ने पाठविलेली सर्व पृष्ठ HSC Marks/Grade या Option मध्ये तपासणीसाठी उपलब्ध होतील Checker User ने सर्व विषयाच्या गुणांच्या/श्रेणीच्या नोंद तपासुन पृष्ठनिहाय मान्य (Approve) करावयाच्या आहेत. सर्व पृष्ठ मान्य (Approve) झाल्यानंतर "Send for Board Approval" हा Option Enable होईल.त्या Option मधून सर्व विषयांचे अंतिम गुण व श्रेणी मंडळाकडे पाठवावयाच्या आहेत.

..२

६. आपल्या कनिष्ठ महाविद्यालय/शाळेमधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाच्या बाबत) व तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, श्रेणी इत्यादी गुणतक्त्यानुसार संबंधित विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवुन सदर गुणतक्त्यावर प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय/शाळेचा शिक्का उमटवुन स्वाक्षरी करावयाची आहे व सदरचे गुणतक्ते विभागीय मंडळाकडे निर्धारीत तारखेस प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकिटावर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव, Index no घालून जमा करावयाचे आहेत. तसेच गुणतक्त्याची एक प्रत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

७. प्रात्याक्षिक, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मुल्यमापन परीक्षा नियमित कालावधीमध्ये देवून न शकलेल्या विद्यार्थ्यासाठी सदरची परीक्षा ऑऊट ऑफ टर्न लेखी परीक्षेनंतर राज्य मंडळाने कळविलेल्या वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात येईल.

८. नियमित कालावधीमध्ये जे विद्यार्थी गैरहजर राहिलेल्या आहेत अशाच विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक सदर ऑऊट ऑफ टर्न परीक्षेसाठी ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालय/शाळांना उपलब्ध करून दिले जातील सदर विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पध्दतीने "Out of Turn Marks" या Option द्वारे नोंदविण्याची कार्यवाही शाळा व महाविद्यालयांनी उपरोक्त पद्धती प्रमाणेच Maker व Checker Login चा वापर करुन करावयाची आहे.

९. अतीविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये आवेदनपत्रे भरलेल्या व गुणांच्या Online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक (Additional Seat No) उपलब्ध झालेले नाही अशा विद्यार्थ्यांचे गुण प्रचलीत पद्धतीने निर्धारित तारखेस विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

१०. प्रात्याक्षिक परीक्षा सुरळीतपणे पार पडतील या दृष्टीने आपण विशेष मार्गदर्शक सुचनांचे पालन करून मंडळास योग्य ते सहकार्य करावे. प्रात्याक्षिक परीक्षेचे साहित्य आपल्या प्रतिनिधी मार्फत संकलन केंद्रावर दिनांक १४/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत जमा करावयाचे आहे.

११. परीक्षा साहित्य निर्धारित तारखेसच जिल्हा संकलन केंद्रवर जमा करणे आवश्यक आहे. या तारखे नंतर परीक्षा साहित्य जमा करण्यासाठी विलंब केल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येइल. विलंबामुळे निकाल राखील राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी .

## STEPS IN ONLINE INTERNAL / GRADE MARKS SUBMISSION HSC/SSC

**START** →

login with existing User name and password

↓

If Maker User is not available Add one user & assign him as maker

↓

Login with MAKER user & download blank Mark List for Exam

↓

After exam, enter marks with MAKER login in mark/grade menu

↓

After entry of all marks for any of the subject is completed. Sent these marks to CHECKER by pressing "SEND FOR APPROVAL TO CHECKER" button.

↓

Login with CHECKER login. Check & approve each page, marks entered by MAKER

↓

After all pages approve by CHECKER. Submit all pages to board by clicking on " SEND FOR BOARD APPROVAL" link

↓

Take final subject wise printouts and submit to divisional board with signature and stamps on given date

→ **Finish**